Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date 04 October 2024

Time 11.00 to 11.05 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: ०४ ऑक्टोबर २०२४ सकाळी ११.०० वाजता.**

****

मराठी भाषा ही भारताचा अभिमान असून, या अद्वितीय भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अभिनंदन केलं आहे. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याच्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या निर्णयानंतर समाजमाध्यमावर लिहिलेल्या संदेशात मोदी यांनी, हा सन्मान म्हणजे मराठी भाषेने आपल्या देशाच्या इतिहासात दिलेल्या समृद्ध सांस्कृतिक योगदानाचा गौरव असल्याचं म्हटलं आहे. मराठी भाषा ही कायमच भारतीय वारशाचा आधारस्तंभ राहिली आहे, अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने ही भाषा शिकण्यासाठी असंख्य लोकांना प्रेरणा मिळेल अशी खात्री असल्याचं पंतप्रधान म्हणाले.

****

केंद्रीय मंत्रीमंडळाच्या या निर्णयाचं स्वागत करताना, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातल्या मराठी प्रेमी, तसेच साहित्यिक, संशोधकांनी केलेल्या प्रयत्नांचंही कौतुक केलं आहे.

अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याने मराठी भाषेचा गौरवशाली इतिहास, सांस्कृतिक वैभव जगभर पोहचेल, असं उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी म्हटलं आहे. मराठीला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याने त्यांनी पंतप्रधानांचे आभार मानून अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी प्रयत्न केलेल्या सर्व मराठी भाषाप्रेमींचे अभिनंदन केलं आहे.

मराठी भाषेच्या सर्वांगिण विकासासाठी आता अनुदानासह केंद्र सरकारच्या पातळीवर सुद्धा सर्व ते सहकार्य मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असल्याची प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे.

****

नाशिक इथं रेल्वे सुरक्षा बलाचा ४० वा स्थापना दिन कार्यक्रम आज रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्या उपस्थितीत होत आहे. कार्यक्रमाच्या सुरवातीला वैष्णव यांनी रेल्वे सुरक्षा बल परेडचं निरीक्षण केलं.

****

राज्य शासनानं युवकांच्या विकासासाठी कौशल्य विद्यापीठ स्थापन केलं, ही अत्यंत अभिमानाची बाब असून, राज्याच्या कौशल्य विकास विभागानं नाविन्यपूर्ण उपक्रमाद्वारे देशात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे, असं केंद्रीय कौशल्य विकास आणि उद्योजकता राज्यमंत्री जयंत चौधरी यांनी म्हटलं आहे. मुंबईच्या एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालयात आय. टी. आय मुंबईचं नामकरण भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, मुंबई असं करण्यात आलं, त्यावेळी ते बोलत होते.

****

काँग्रेस नेते आणि लोकसभेतले विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी आजपासून दोन दिवस कोल्हापूरच्या दौऱ्यावर येत आहेत. कसबा बावडा इथल्या भगवा चौकात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचं अनावरण त्यांच्या हस्ते होणार असून, उद्या ते संविधान सन्मान संमेलनाला ते उपस्थित राहणार आहेत.

****

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत राज्यातल्या १ कोटी ९६ लाख ४३ हजार २०७ पात्र महिलांच्या खात्यात तिसऱ्या टप्प्यातली लाभाची रक्कम जमा झाल्याची माहिती उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिली. आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात त्यांनी उर्वरित पात्र महिलांच्या खात्यातही लवकरच रक्कम जमा होईल, असं म्हटलं आहे.

****

राज्यात औद्योगिक विकासासाठी सरकारचे सर्वोतोपरी प्रयत्न सुरु असून, राज्य परदेशी गुंतवणुकीत प्रथम क्रमांकावर आहे, असं उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सांगितलं. नाशिक इथं आयोजित उद्यमात सकल समृद्धी- महाराष्ट्राची उद्योग भरारी या कार्यक्रमात ते काल बोलत होते. राज्यात, गेल्या तीन महिन्यांत ७५ हजार कोटी रुपयांची परकीय गुंतवणूक झाल्याची माहिती त्यांनी दिली. राज्यात उद्योगांना प्रोत्साहन देण्यासाठी, उद्योजकांबरोबर लघू उद्योगांनाही कर्ज पुरवठा करण्याचे निर्देश, बँकांना दिल्याचं सामंत यांनी सांगितलं.

****

जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समावेशासाठी नामांकनाच्या मूल्यांकन प्रक्रियेचा एक भाग म्हणून युनेस्कोच्या शिष्टमंडळानं काल रायगड किल्ल्याला भेट देऊन पाहणी केली. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण आणि राज्य पुरातत्व विभागाचे अधिकारीही यावेळी उपस्थित होते. या पथकानं कुशावर्त तलाव, होळीचा माळ, जगदीश्वर मंदिर, बाजारपेठ, छत्रपती शिवाजी महाराजांची समाधी, हत्तीखाना, भवानी मंदिर आणि टकमक टोक, या महत्त्वपूर्ण ठिकाणांसह विविध ऐतिहासिक ठिकाणांना भेट दिली. तसंच किल्ल्याचा इतिहास आणि सद्यस्थितीबद्दल तपशीलवार माहिती घेतली.

****

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणी संस्थाचालकांना कल्याणच्या विशेष न्यायालयानं एका गुन्ह्यात जामीन दिला पण दुसऱ्या गुन्ह्यात अटक करण्याचे आदेश दिले. या दुसऱ्या गुन्ह्यासाठी त्यांना आज न्यायालयात सादर केलं जाण्याची शक्यता आहे. अध्यक्ष उदय कोतवाल आणि सचिव तुषार आपटे यांना कर्जतमधून अटक झाली होती. या प्रकरणातला आरोपी अक्षय शिंदेच्या चकमकीतल्या मृत्यू प्रकरणाच्या चौकशीला गती देण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयानं दिले असून, चौकशीचा अहवाल १८ नोव्हेंबरला सादर करण्यास सांगितलं आहे.

****

लातूर जिल्हा परिषदेचा समाज कल्याण विभाग, जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र, आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने क्रीडा संकुल इथं काल सेरेब्रल पाल्सी, बहुविकलांग, दिव्यांग मुलांसोबत चालण्याचा उपक्रम आयोजित करण्यात आला होता. या उपक्रमाला नागरिकांचा, दिव्यांग मुलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

****